महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक - ७**

# महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११.

**( दिनांक २६ जानेवारी २०१६ पर्यंत सुधारित )**

**Maharashtra Act No. VII of 2014.**

# The Maharashtra Educational Institutions ( Regulation of Fee ) Act, 2011.

*( As modified upto the 26th January, 2016 )*

व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४ यांनी प्रकाशित केले.

**२०१५**

[ किंमत रु. : ]

# सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक - ७
# महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११

## अनुक्रमणिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| | **प्रास्ताविक** | |
| | **प्रकरण एक** | |
| | **प्रारंभिक.** | |
| **१.** | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | ०१ |
| **२.** | व्याख्या. | ०१ |
| | **प्रकरण दोन** | |
| | **जादा शुल्क गोळा करण्यास प्रतिबंध करणे व शुल्क निश्चित करणे.** | |
| **३.** | जादा शुल्क गोळा करण्यास प्रतिबंध. | ०५ |
| **४.** | पालक-शिक्षक संघ. | ०५ |
| **५.** | शासकीय शाळा आणि अनुदानित शाळांमध्ये शुल्काचे विनियमन. | ०६ |
| **६.** | खाजगी, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमधील शुल्काचे विनियमन. | ०६ |
| **७.** | विभागीय शुल्क नियामक समिती घटित करणे. | ०८ |
| **८.** | विभागीय शुल्क नियामक समितीच्या अध्यक्षाचा व इतर सदस्यांचा पदावधी. | ०८ |
| **९.** | शुल्क निश्चित करण्यासाठीचे घटक. | ०९ |
| **१०.** | विभागीय शुल्क नियामक समितीचे अधिकार व कार्ये. | १० |
| **११.** | पुनरीक्षण समिती घटित करणे. | १२ |
| **१२.** | विभागीय शुल्क नियामक समितीच्या विवक्षित तरतुदी पुनरीक्षण समितीला लागू करणे. | १२ |
| **१३.** | सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण. | १२ |
| | **प्रकरण तीन** | |
| | **लेख्यांचे विनियमन आणि अभिलेखांचे परिरक्षण** | |
| **१४.** | लेख्यांचे विनियमन. | १३ |
| **१५.** | अभिलेखांचे परिरक्षण. | १३ |

## **अनुक्रमणिका**--चालू

| **कलमे** | | **पृष्ठे** |
|---|---|---|


**प्रकरण चार**

**अपराध व शास्ती**

| | | |
|---|---|---|
| **१६.** | अपराध व शास्ती. | १३ |
| **१७.** | व्यवस्थापनाने केलेले अपराध. | १३ |
| **१८.** | अपराध आपसात मिटवणे. | १४ |
| **१९.** | अपराधांची दखल घेणे. | १४ |
| **२०.** | अपराध दखलपात्र असणे. | १४ |

**प्रकरण पाच**

**संकीर्ण**

| | | |
|---|---|---|
| **२१.** | निदेश देण्याचा अधिकार. | १५ |
| **२२.** | नियम करण्याचा अधिकार. | १५ |
| **२३.** | हा अधिनियम अन्य कोणत्याही अधिनियमास पूरक असणे व अल्पीकरण करणारा नसणे. | १५ |
| **२४.** | अडचणी दूर करण्याचा अधिकार. | १५ |

## सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक - ७

# महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११

[ मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** "
दिनांक २१ मार्च २०१४ रोजी प्रथम प्रसिध्द केलेला अधिनियम. ]

**महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** शिक्षणाच्या राष्ट्रीय धोरणामध्ये, शिक्षणाच्या व्यापारीकरणास व शैक्षणिक संस्थांच्या नफेखोरीस आळा घालणे अभिप्रेत आहे ;

**आणि ज्याअर्थी,** शैक्षणिक संस्थांच्या नफेखोरीतून चालणारे शिक्षणाचे व्यापारीकरण रोखण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत असे राज्य शासनाला वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** अशा शैक्षणिक संस्थांकडून भरमसाठ शुल्क आकारण्याची प्रथा राज्यात वाढत चालली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** गुणवान व गरीब विद्यार्थ्यांमध्ये वैफल्य निर्माण करणाऱ्या या अनिष्ट प्रथेला परिणामकारकपणे आळा घालण्याच्या आणि शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने, जनहितार्थ, महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या शुल्काचे विनियमन करणे आणि त्याच्याशी संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतदू करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(क) "विद्याविषयक वर्ष" याचा अर्थ, शासनाने किंवा, यथास्थिति, संबंधित शाळा ज्याला संलग्न असेल अशा कोणत्याही मंडळाने किंवा परिषदेने विनिर्दिष्ट केलेले वर्ष, असा आहे ;

(ख) " अनुदानित शाळा " याचा अर्थ, शासनाकडून किंवा समुचित प्राधिकरणाकडून शाळेचा खर्च भागविण्यासाठी, खर्चाच्या पूर्ण किंवा अंशतः आर्थिक किंवा बिगर आर्थिक स्वरूपात कोणत्याही प्रकारचे आवर्ती अनुदान किंवा सहाय्य घेणारी शाळा, असा आहे;

(ग) " नेमून दिलेला दिनांक " याचा अर्थ, कलम १ च्या पोट-कलम (३) अन्वये, राज्य शासनाने नेमून दिलेला दिनांक, असा आहे ;

(घ) " विभागीय शुल्क नियामक समिती " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ७ अन्वये घटित केलेली विभागीय शुल्क नियामक समिती, असा आहे ;

(ङ) " उप संचालक " याचा अर्थ, शिक्षण उप संचालक किंवा शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्या अधिपत्याखाली काम करणारा राज्य शासनाने पदनिर्देशित केलेला असा इतर कोणताही समकक्ष अधिकारी किंवा राज्यात कोणत्याही प्रकारचे शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या पर्यवेक्षणाचे काम सोपवलेले राज्य शासनाच्या इतर कोणत्याही संचालनालयाचे उप संचालक, असा आहे;

(च) " अध्यापक विद्यालय " याचा अर्थ, राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेने मान्यता दिलेले अध्यापक शिक्षण प्रशिक्षण पदविका विद्यालय, असा आहे ;

(छ) " संचालक " याचा अर्थ, शिक्षण संचालक किंवा राज्य शासनाने पदनिर्देशित केलेला असेल असा इतर कोणताही समकक्ष अधिकारी असा आहे आणि त्यामध्ये शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), किंवा राज्यात कोणत्याही प्रकारचे शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या पर्यवेक्षणाचे काम सोपवलेले राज्य शासनाच्या इतर कोणत्याही संचालनालयाचे संचालक, असा आहे ;

(ज) " शैक्षणिक विभाग " याचा अर्थ, राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिसूचित केलेला शैक्षणिक विभाग असा आहे ;

(झ) " कार्यकारी समिती " याचा अर्थ, पालक-शिक्षक संघाची कार्यकारी समिती, असा आहे ;

(ञ) " शुल्क " याचा अर्थ, कलम ५ आणि ६ अन्वये शुल्क म्हणून निश्चित केली असेल अशी कोणतीही रक्कम असा आहे आणि त्यामध्ये,—

(एक) शिकवणी शुल्क ;

(दोन) सत्र शुल्क, जी प्रत्येक सत्रासाठी एका महिन्याच्या शिकवणी शुल्कपेक्षा अधिक नसेल ;

(तीन) ग्रंथालय शुल्क ; व अनामत रक्कम ;

(चार) प्रयोगशाळा शुल्क ; व अनामत रक्कम ;

(पाच) जिमखाना शुल्क ;

(सहा) तारण धन ;

(सात) परीक्षा शुल्क ;

(आठ) वसतिगृह शुल्क ; व भोजनालय शुल्क ;

(नऊ) प्रवेश शुल्क ;

**स्पष्टीकरण.**— विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शाळेत इयत्ता दहावीपर्यंत किंवा त्याखालील ज्या वर्गापर्यंत शिक्षणाची सुविधा आहे, त्या शाळेत त्या विद्यार्थ्यास इयत्ता दहावीपर्यंत किंवा त्याखालील असलेल्या वर्गापर्यंत पुन्हा प्रवेश शुल्क देण्याची आवश्यकता असणार नाही ;

(दहा) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही अभ्यासक्रमविषयक किंवा अभ्यासांतर्गत बाबीकरिता द्यावयाची अनामत रक्कम वा रकमा, यांचा समावेश होतो ;

(ट) " शासन " याचा अर्थ, राज्य शासन किंवा, यथास्थिति, केंद्र सरकार, असा आहे ;

(ठ) " शासकीय शाळा " याचा अर्थ, शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेली, त्यांच्या मालकीची असलेली किंवा त्यांच्याकडून चालविली जाणारी शाळा, असा आहे ;

(ड) " स्थानिक प्राधिकरण " याचा अर्थ,—

१९६२ चा महा ५. (एक) जिल्हा परिषदेने चालविलेल्या शैक्षणिक संस्थेच्या संबंधात, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये घटित केलेली जिल्हा परिषद ;

(दोन) महानगरपालिकांनी चालविलेल्या शैक्षणिक संस्थेच्या संबंधात, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा यथास्थिति, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये घटित केलेल्या महानगरपालिका; १८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

(तीन) नगरपरिषदेने, नगर पंचायतीने किंवा औद्योगिक नगरीने चालविलेल्या शैक्षणिक संस्थांच्या संबंधात, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये घटित केलेली नगरपरिषद, नगर पंचायत किंवा औद्योगिक नगरी ; १९६५ चा महा. ४०.

(चार) अन्य कोणत्याही कायद्यान्वये स्थानिक प्राधिकरण म्हणून समजले जाणारे अन्य कोणतेही प्राधिकरण, असा आहे ;

(ढ) " व्यवस्थापन " याचा अर्थ,—

(एक) शासनाने चालविलेल्या शाळेच्या बाबतीत, शासन ;

(दोन) स्थानिक प्राधिकरणाने चालविलेल्या शाळेच्या बाबतीत, स्थानिक प्राधिकरण ;

(तीन) अन्य कोणत्याही बाबतीत, एखाद्या शाळेचा कारभार जिच्याकडे सोपवण्यात आला आहे अशा शाळेची व्यवस्थापन समिती किंवा नियामक मंडळ, मग ते कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो किंवा जेथे असा कारभार कोणत्याही व्यक्तीकडे सोपवण्यात आला असेल मग ती कोणत्याही नावाने किंवा पदाधिनामाने संबोधण्यात येवो, तेथे, त्यामध्ये, अशा व्यक्तींचा समावेश होतो, असा आहे ;

(ण) " अल्पसंख्यांक वर्गाची शैक्षणिक संस्था " याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) अन्वये शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार असलेल्या अल्पसंख्यांक वर्गाने स्थापन केलेली व प्रशासित केलेली शासनमान्य संस्था, असा आहे ;

(त) " पालक-शिक्षक संघ " याचा अर्थ, कलम ४ अन्वये घटित करण्यात आलेला पालक-शिक्षक संघ, असा आहे ;

(थ) " पूर्व-प्राथमिक शाळा " याचा अर्थ, शाळेला विहित रीतीने जोडलेली ३ ते ६ वयोगटातील बालकांसाठी, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी कोणत्याही माध्यमाची बालवाडी, छोटा शिशू, मोठा शिशू, कोणत्याही पूर्व प्राथमिक पातळीपर्यंत शिक्षण देणारी शाळा, असा आहे, मात्र त्यामध्ये शिशुगृहाचा समावेश असणार नाही ;

(द) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ध) " प्राथमिक शिक्षण " याचा अर्थ, इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे शिक्षण, असा आहे ;

(न) " खाजगी शैक्षणिक संस्था " याचा अर्थ, शाळा किंवा अध्यापक विद्यालय चालविणारे अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनासह कोणतेही खाजगी व्यवस्थापन, असा आहे ;

(प) " नफेबाजी " याचा अर्थ, रोखीच्या वा वस्तूच्या स्वरूपात, या अधिनियमान्वये निश्चित केलेल्या अथवा मान्य केलेल्या शुल्कापेक्षा अधिक असलेली कोणतीही रक्कम, असा आहे ;

(फ) " पुनरीक्षण समिती " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ११ अन्वये स्थापन करण्यात आलेली पुनरीक्षण समिती, असा आहे ;

(ब) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेले नियम, असा आहे ;

(भ) "शाळा" याचा अर्थ, पूर्व-प्राथमिक शाळा, प्राथमिक शाळा, प्राथमिक शिक्षण देणारी शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालये अशी कोणतीही शासनमान्य शाळा असून, ती कोणत्याही व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणारी व कोणत्याही भारतीय वा परदेशी अभ्यासक्रमास अथवा मंडळास संलग्न असलेली अनुदानित, अंशतः अनुदानित, विना-अनुदानित किंवा कायम विना-अनुदानित शाळा, असा आहे, यात कोणत्याही अल्पसंख्यांक वर्गाकडून स्थापन केलेल्या व प्रशासित केलेल्या संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या शाळेचा समावेश असेल, परंतु त्यामध्ये केवळ धार्मिक शिक्षण देणाऱ्या शाळांचा समावेश असणार नाही.

प्रकरण दोन

## जादा शुल्क गोळा करण्यास प्रतिबंध करणे व शुल्क निश्चित करणे.

**३.** कोणतीही शाळा स्वतः किंवा तिच्यावतीने या अधिनियमान्वये निश्चित केलेल्या अथवा मान्य केलेल्या शुल्कापेक्षा अधिकची रक्कम घेणार नाही. जादा शुल्क गोळा करण्यास प्रतिबंध.

**४.** (१) (क) प्रत्येक खाजगी शाळा, पालक-शिक्षक संघ घटित करेल. पालक-शिक्षक संघ.

(ख) पालक-शिक्षक संघ, प्रत्येक विद्याविषयक वर्षाच्या सुरूवातीला तीस दिवसांच्या आत शाळा प्रमुखाद्वारे स्थापन करण्यात येईल. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याचे पालक हे पालक-शिक्षक संघाचे सदस्य असतील आणि शहरी क्षेत्रासाठी पन्नास रुपये व ग्रामीण क्षेत्रासाठी वीस रुपये इतकी रक्कम दरवर्षी अशा संघाच्या प्रत्येक सदस्याकडून गोळा करण्यात येईल.

(ग) पालक-शिक्षक संघ स्थापन झाल्यावर कार्यकारी समिती घटित करण्यासाठी प्रत्येक इयत्तेसाठी प्रतिनिधीत्त्व मिळविण्याकरिता प्रत्येक इयत्तेतील विद्यार्थ्यांच्या इच्छुक पालकांच्या नावांच्या चिठ्ठ्यांमधून सोडतीद्वारे समितीच्या सदस्यांची निवड करण्यात येईल आणि अशा सोडतीच्या एक आठवडा अगोदर, अशी नोटीस, पालक-शिक्षक संघाच्या सदस्यांना देण्यात येईल.

(२) (क) कार्यकारी समिती पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल :—

(एक) अध्यक्ष - प्राचार्य किंवा मुख्याध्यापक,

(दोन) उपाध्यक्ष - पालकांमधील एक पालक,

(तीन) सचिव - शिक्षकांमधील एक शिक्षक,

(चार) दोन सहसचिव - पालकांमधून दोन्ही,

(पाच) सदस्य - प्रत्येक इयत्तेतील एक पालक व एक शिक्षक.

(ख) कार्यकारी समितीतील एकूण सदस्यांपैकी किमान एक सदस्य हा, विहित करण्यात येईल अशा रीतीने आळीपाळीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग यांमधील असेल आणि किमान पन्नास टक्के सदस्य महिला असतील.

(ग) कार्यकारी समितीच्या सदस्यांची यादी, कार्यकारी समितीची स्थापना केल्यापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल आणि तिची प्रत तात्काळ संबंधित शिक्षण अधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल.

(घ) पालक-शिक्षक संघाच्या कार्यकारी समितीची मुदत एक विद्याविषयक वर्षाच्या कालावधीसाठी असेल आणि कार्यकारी समितीची स्थापना केल्यापासून तीन वर्षांच्या कालावधीच्या आत, कार्यकारी समितीचा कोणताही सदस्य निवडीसाठी सोडतीत भाग घेण्यासाठी पात्र असणार नाही :

परंतु, ज्या शाळेत दोनच शिक्षक आहेत त्या शाळेच्या बाबतीत वरील खंड (क) च्या उप-खंड (एक), (तीन) व (पाच) च्या बाबतीत शिक्षक सदस्य निवडीसाठी तीन वर्षे कालावधीची अट लागू असणार नाही.

(ङ) कार्यकारी समितीची तीन महिन्यांतून किमान एकदा बैठक घेण्यात येईल. कार्यकारी समितीची बैठक घेण्याची कार्यपद्धती विहित केल्यानुसार अशी असेल.

(च) पालक-शिक्षक संघाची प्रत्येक वर्षाच्या १५ ऑगस्टपर्यंत किमान एक सर्वसाधारण सभा घेण्यात येईल. पालक-शिक्षक संघाची बैठक घेण्याची कार्यपद्धती विहित केल्यानुसार अशी असेल. पालक-शिक्षक संघ या अधिनियमान्वये नेमून देण्यात येतील अशी कर्तव्ये व कार्ये आणि विहित करण्यात येतील अशी कर्तव्ये व कार्ये पार पाडील.

शासकीय शाळा आणि अनुदानित शाळांमध्ये शुल्काचे विनियमन.

**५.** शासकीय शाळा व अनुदानित शाळांमधील शुल्काचे विनियमन करण्यासाठी शासन सक्षम असेल. शासन निर्धारित करील अशारितीने शुल्क निश्चित करण्यात येईल.

खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमधील शुल्काचे विनियमन.

**६.** (१) खाजगी विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित शाळांचे व्यवस्थापन, अशा शाळांमधील शुल्क प्रस्तावित करण्यास सक्षम असेल.

(२) कार्यकारी समितीची स्थापना झाल्यावर, शाळेचे व्यवस्थापन, कार्यकारी समितीकडे संबद्ध अभिलेखासह प्रस्तावित शुल्काचे तपशील सादर करील. अशी शाळा, कार्यकारी समितीला, पुढील विद्याविषयक वर्षाच्या प्रारंभाच्या किमान सहा महिन्यांपूर्वी त्याच्या मान्यतेसाठी सर्व संबंधित अभिलेख पुरवील. मान्यता देताना कार्यकारी समितीला, नव्याने शुल्काची रक्कम निश्चित करण्याचा प्राधिकार असेल.

(३) कलम ९ मध्ये घालून दिलेल्या सर्व संबंधित घटकांचा विचार केल्यानंतर, कार्यकारी समिती, पोट-कलम (२) अन्वये प्रस्तावित शुल्क आणि अभिलेख प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत शुल्काला मान्यता देईल आणि अशा प्रकारे मान्यता दिलेल्या शुल्काचे तपशील व्यवस्थापनाला तात्काळ लेखी कळवील. अशा प्रकारे कार्यकारी समितीने मान्याता दिलेल्या शुल्काचा तपशील मराठी, इंग्रजी आणि ज्या माध्यमाची शाळा असेल त्या भाषेत सूचना फलकावर आणि शाळेचे संकेतस्थळ असल्यास, शाळेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करील व ते दोन विद्याविषयक वर्षांसाठी बंधनकारक असेल.

(४) कार्यकारी समिती, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत शुल्क निश्चित करण्यास कसूर करीत असेल तर, व्यवस्थापन, विहित करण्यात येईल अशा रीतीने, कार्यकारी समितीला माहिती देऊन विभागीय शुल्क नियामक समितीकडे त्याच्या निर्णयासाठी बाब तात्काळ विचारार्थ पाठवील. विचारार्थ पाठविण्यात आलेली बाब प्रलंबित असताना, शाळा व्यवस्थापनाला विभागीय शुल्क नियामक समितीचा अंतिम निर्णय येईपर्यंत मागील विद्याविषयक वर्षाचे शुल्क अधिक त्यात पंधरा टक्के वाढ एवढे शुल्क गोळा करण्याची मुभा असेल.

(५) व्यवस्थापनाकडून ठरविण्यात आलेले शुल्क आणि कार्यकारी समितीने मान्यता दिलेले शुल्क यामधील तफावत ही, पंधरा टक्क्यांपेक्षा अधिक नसेल तर, पोट-कलम (३) अन्वये कार्यकारी समितीने कळविलेले शुल्क व्यवस्थापनेवर बंधनकारक असेल आणि अशी तफावत पंधरा टक्क्यांहून अधिक असेल तर, व्यवस्थापनास, पोट-कलम (३) अन्वये असे कळविल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत विहित करण्यात येईल अशा रीतीने विभागीय शुल्क नियामक समितीकडे अपील दाखल करता येईल :

परंतु, एखादे अपील किंवा निर्देशित प्रकरण वेळेच्या आत दाखल करण्यात न आल्याबद्दल पुरेसे कारण असल्याबाबत जर विभागीय शुल्क नियामक समितीची खात्री पटली तर, तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरही ते अपील किंवा निर्देशित प्रकरण समितीस दाखल करून घेता येईल.

(६)(क) विभागीय शुल्क नियामक समिती, अपील किंवा निर्देशित प्रकरण दाखल केल्याच्या दिनांकापासून शक्यतोवर नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत विरोधी पक्षकारास आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर अपिलावर किंवा निर्देशित प्रकरणावर निर्णय देईल.

(ख) विभागीय शुल्क नियामक समिती अपिलावर किंवा निर्देशित प्रकरणावर निर्णय देताना व्यवस्थापनाने प्रस्तावित केलेल्या शुल्काला किंवा यथास्थिति, कार्यकारी समितीने मान्य केलेल्या शुल्काला स्थगिती देणार नाही.

(ग) अपिलावरील किंवा निर्देशित प्रकरणावरील निर्णयावर, विभागीय शुल्क नियामक समितीस, संबंधित विद्यार्थ्याला अतिरिक्त शुल्काचा परतावा देण्याबाबतचे समुचित आदेश देता येतील. अशा विद्यार्थ्याला अतिरिक्त शुल्काचा परतावा देण्यास व्यवस्थापन कसूर करीत असेल त्याबाबतीत, विभागीय शुल्क नियामक समिती, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून व्यवस्थापनाकडून अशी अतिरिक्त शुल्क वसूल करण्याची आणि ती अशा विद्यार्थ्याला प्रदान करण्याची कार्यवाही करील.

(घ) विभागीय शुल्क नियामक समितीच्या अपिलातील किंवा निर्देशित प्रकरणातील निर्णय संबंधित शाळेच्या सूचना फलकावर आणि शाळेचे संकेतस्थळ असल्यास, शाळेच्या संकेत स्थळावर व्यवस्थापनाकडून प्रदर्शित करण्यात येईल.

(७) विभागीय शुल्क नियामक समितीच्या अपिलातील किंवा निर्देशित प्रकरणातील निर्णय अमान्य असेल तर, व्यवस्थापन किंवा कार्यकारी समिती यांना निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल अशा रीतीने पुनरीक्षण समितीसमोर अपील दाखल करता येईल.

विभागीय शुल्क नियामक समिती घटित करणे.

**७.** (१) शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे प्रत्येक शैक्षणिक विभागासाठी एक विभागीय शुल्क नियामक समिती घटित करील.

(२) विभागीय शुल्क नियामक समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

| | | |
|---|---|---|
| (क) उच्च न्यायालयाशी विचार-विनिमय करून शासनाद्वारे नामनिर्देशित करावयाचा एक सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश | – | अध्यक्ष. |
| (ख) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा विभागीय अध्यक्ष | – | सदस्य. |
| (ग) सनदी लेखापाल किंवा व्यय व कामे लेखापाल | – | सदस्य. |
| (घ) केंद्रिय शालेय शिक्षण मंडळाचा किंवा भारतीय माध्यमिक शिक्षण प्रमाणपत्र मंडळाचा किंवा इतर कोणत्याही मंडळाचा सेवानिवृत्त प्रमुख किंवा कोणत्याही शैक्षणिक संस्थाशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंध नसलेले शासनाचे शिक्षण सहसंचालक या दर्जाहून कमी दर्जा नसलेला सेवानिवृत्त अधिकारी | – | सदस्य. |
| (ङ) प्रादेशिक शिक्षण उपसंचालक | – | पदसिद्ध सदस्य-सचिव. |

(३) पोट-कलम (२) च्या खंड (ग) व (घ) खालील प्रत्येक सदस्याची नियुक्ती, निवड समितीच्या शिफारशीवरून राज्य शासनाकडून करण्यात येईल.

(४) राज्य शासन, पुढील सदस्य मिळून बनलेली विभागीय शुल्क नियामक समितीकरिता एक निवड समिती घटित करील, ती अशी :—

| | | |
|---|---|---|
| (क) पुनरीक्षण समितीचा अध्यक्ष | – | अध्यक्ष |
| (ख) प्रभारी सचिव, विधि व न्याय विभाग | – | सदस्य |
| (ग) प्रभारी सचिव, शालेय शिक्षण विभाग | – | सदस्य : |

परंतु, पुनरीक्षण समितीचा अध्यक्ष, अनुपस्थित राहिल्यामुळे किंवा अन्यथा निवड समितीचा अध्यक्ष म्हणून काम करण्यास असमर्थ असेल तर कलम ११ च्या पोट-कलम (२) च्या परंतुकाअन्वये कार्यरत असणारा अध्यक्ष हा, अध्यक्ष म्हणून काम करील.

विभागीय शुल्क नियामक समितीच्या अध्यक्षाचा व इतर सदस्यांचा पदावधी.

**८.** (१) विभागीय शुल्क नियामक समितीच्या अध्यक्षाचा व सदस्यांचा पदावधी त्यांच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी असेल आणि कोणत्याही कारणास्तव पद रिक्त झाल्यास असे रिक्त पद उर्वरित पदावधीसाठी भरण्यात येईल.

(२) विभागीय शुल्क नियामक समितीचे अध्यक्ष व सदस्य पुनर्नियुक्तीसाठी पात्र नसतील.

(३) अध्यक्ष किंवा सदस्य शासनाला लेखी राजीनामा सादर करू शकेल आणि असा राजीनामा स्वीकृत झाल्यावर त्याचे पद रिक्त होईल व ते ज्या दिनांकास पद रिक्त झाले आहे तेव्हापासून तीन महिन्यांच्या कालावधीत शासनाकडून ते पद भरण्यात येईल.

(४) शासनाच्या मते जर अशा समितीच्या अध्यक्षाने किंवा सदस्याने सदस्य म्हणून राहण्यास अयोग्य कृती केली तर समितीच्या अध्यक्षास किंवा सदस्यास, पदावरून दूर करण्यात येईल. अशा प्रकारे दूर करण्यात आलेला अध्यक्ष किंवा सदस्य विभागीय शुल्क नियामक समितीवर पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही :

परंतु, अशा अध्यक्षास किंवा सदस्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज विभागीय शुल्क नियामक समितीवरून दूर करता येणार नाही.

(५) विभागीय शुल्क नियामक समितीच्या अध्यक्षास व सदस्यास द्यावयाचे वेतन व भत्ते हे विहित केल्याप्रमाणे असतील.

(६) जर एखादी व्यक्ती,—

(क) तिला शासनाच्या मते नैतिक अध:पतनाच्या मानल्या गेलेल्या अपराधांसाठी अपराधसिद्धीनंतर तुरुंगवास झाला असेल ; किंवा

(ख) ती अमुक्त नादार असेल ; किंवा

(ग) ती विकल मनाची असेल आणि असे एखाद्या सक्षम न्यायालयाने घोषित केले असेल; किंवा

(घ) तिला शासनाच्या किंवा शासनाच्या मालकीच्या किंवा तिच्या नियंत्रणाखालील एखाद्या निगम निकायातील सेवेतून दूर केले असेल किंवा बडतर्फ केले असेल ; किंवा

(ङ) शासनाच्या मते, सदस्य म्हणून तिची कर्तव्ये पार पाडताना बाधक परिणाम होण्याची शक्यता आहे असे आर्थिक किंवा इतर हितसंबंध असतील ; किंवा

(च) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही अनर्हता तिच्याकडे असेल ; किंवा

(छ) कोणतेही पद धारण करीत असेल किंवा कोणत्याही मार्गाने कोणत्याही शैक्षणिक संस्थेशी संबंधित असेल,

तर अशी व्यक्ती विभागीय शुल्क नियामक समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नियुक्त होण्यास अनर्ह ठरेल.

**९.** (१) शाळेकडून आकारणीयोग्य असलेले शुल्क निश्चित करताना पुढील घटकांचा विचार करण्यात येईल :— शुल्क निश्चित करण्यासाठीचे घटक.

(क) शाळेचे ठिकाण ;

(ख) गुणात्मक शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या पायाभूत सोयी-सुविधा, पुरविण्यात आलेल्या आणि शाळेच्या माहिती पुस्तिकेत किंवा संकेतस्थळावर नमूद केलेल्या सुविधा ;

(ग) शासन किंवा समुचित प्राधिकरण वेळोवेळी विहित करील त्याप्रमाणे शाळेचा शैक्षणिक दर्जा ;

(घ) प्रशासन व परिरक्षणावरील खर्च ;

(ङ) अनिवासी भारतीयांकडून, व्यवस्थापनाचा धर्मादाय भाग म्हणून आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना शुल्क माफी देण्यासाठी किंवा विविध शासकीय योजनांतर्गत अन्य बाबींसाठी शाळेला शासनाने दिलेले अंशदान, यामधून उभारलेला अतिरिक्त निधी ;

(च) मानकांनुसार अर्हताप्राप्त अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारी वर्ग आणि त्यांचे वेतन घटक ;

(छ) वार्षिक वेतनवाढीसाठी वाजवी रक्कम ;

(ज) शाळेला एकूण उत्पन्नाच्या तुलनेत विद्यार्थ्यांकरिता येणारा खर्च व शाळेच्या गुणात्मक विकासासाठी वाजवी अधिक्य ;

(झ) विहित करता येतील असे इतर कोणतेही घटक.

(२) विभागीय शुल्क नियामक समिती जे विविध शीर्ष दर्शविल त्या शीर्षाखाली शुल्क आकारण्यात येईल.

(३) विभागीय शुल्क नियामक समितीकडे अपील सादर करणाऱ्या प्रत्येक खाजगी शाळेला, तिच्या सूचना फलकावर अपिलावरील निर्णयाची प्रत लावावी लागेल व शाळेचे संकेतस्थळ असल्यास, शाळेच्या संकेतस्थळावर अपिलावरील निर्णयाची प्रत ठेवावी लागेल.

विभागीय शुल्क नियामक समितीचे अधिकार व कार्ये.

**१०.** (१) विभागीय शुल्क नियामक समितीचे अधिकार व कार्य ही, शालेय व्यवस्थापन व पालक-शिक्षक संघ यांच्यामधील शालेय व्यवस्थापनाद्वारे आकारण्यात यावयाच्या शुल्काच्या संबंधातील विवादाचा अभिनिर्णय करणे अशी असतील,

(२) समितीस आवश्यक वाटल्यास आणि उक्त समितीसमोर आलेल्या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी जर असे अभिलेखे, लेखे, नोंदवह्या किंवा इतर दस्तऐवज आवश्यक व प्रस्तुत वाटले तर, अशी संस्था किंवा व्यवस्थापन यांच्या मालकीचे असे कोणतीही अभिलेखे, लेखे, नोंदवह्या किंवा इतर दस्तऐवज यांची तपासणी, निरीक्षण व ते जप्त करण्यासाठी विभागीय शुल्क नियामक समिती, शिक्षण अधिकारी किंवा शिक्षण निरीक्षक यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या एखाद्या अधिकाऱ्यास कोणत्याही शैक्षणिक संस्थेत किंवा अशा संस्थेच्या व्यवस्थापनाच्या मालकीच्या जागेत प्रवेश करण्यास प्राधिकृत करू शकेल. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या तपासणी १९७४ चा २.
व जप्ती यासंबंधातील तरतुदी शक्य असेल तेथवर या कलमाखालील तपासणी व जप्ती यासाठी लागू असतील.

(३) विभागीय शुल्क नियामक समिती, तिची कार्ये पार पाडण्यासाठी तिची स्वतःच्या कार्यपद्धतीचे नियमन करील आणि या अधिनियमान्वये कोणतीही चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ तिला पुढील बाबी संबंधातील दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाला असलेले सर्व अधिकार असतील, ते असे : १९०८ चा ५.

(एक) कोणत्याही साक्षीदाराला उपस्थित राहण्याचे समन्स देणे आणि शपथेवर त्याची तपासणी करण्यास भाग पाडणे ;

(दोन) कोणत्याही कागदपत्राचा शोध घेणे व ते सादर करणे ;

(तीन) शपथपत्रावर साक्षीपुरावा मिळविणे ;

(चार) साक्षीदारांच्या तपासणीसाठी कोणतेही आयोगपत्र काढणे.

(४) अध्यक्षाच्या अनुपस्थितीत विभागीय शुल्क नियामक समितीला कोणताही न्यायिक आदेश काढता येणार नाही. विभागीय शुल्क नियामक समितीचा आदेश त्याच्या समोरील कार्यवाहीच्या पक्षकारांवर दोन विद्याविषयक वर्षांसाठी बंधनकारक असेल. या अधिनियमाअन्वये घटित केलेल्या पुनरीक्षण समितीपुढे अपील दाखल करण्याव्यतिरिक्त त्या आदेशाविरुद्ध कोणत्याही दिवाणी न्यायालयात हरकत घेता येणार नाही.

(५) विवाद मिटविण्याच्या वेळी विभागीय शुल्क नियामक समिती शाळा व्यवस्थापनाने निश्चित केलेल्या शुल्कबाबत कोणताही अंतरिम स्थगिती आदेश जारी करणार नाही. अपिलावरील किंवा निर्देशित प्रकरणावरील निर्णयावर, विभागीय शुल्क नियामक समितीस, संबंधित विद्यार्थ्याला अतिरिक्त शुल्काचा परतावा देण्याबाबतचे समुचित आदेश देता येतील. अशा विद्यार्थ्याला अतिरिक्त शुल्काचा परतावा देण्यास व्यवस्थापन कसूर करीत असेल त्या बाबतीत, विभागीय शुल्क नियामक समिती, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून व्यवस्थापनाकडून असे अतिरिक्त शुल्क वसूल करण्याची आणि ते अशा विद्यार्थ्याला प्रदान करण्याची कार्यवाही करील.

(६) विभागीय शुल्क नियामक समिती, एखाद्या खाजगी शाळेने आकारावयाचे शुल्क समितीने निश्चित केल्यावर तिचा हा निर्णय सर्व संबंधितांना कळवील.

(७) विभागीय शुल्क नियामक समिती जी विविध शीर्षे दर्शविल त्या शीर्षाखाली शुल्क आकारण्यात येईल.

(८) विभागीय शुल्क नियामक समितीने काढलेले आदेश खाजगी शाळेवर पुढील दोन विद्याविषयक वर्षांसाठी बंधनकारक असतील, उक्त कालावधीच्या शेवटी खाजगी शाळेला या अधिनियमान्वये निर्धारित केलेली कार्यपद्धती अनुसरून तिच्या शुल्क संरचनेत बदल प्रस्तावित करण्याचे स्वातंत्र्य असेल.

**११.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्यात एक पुनरीक्षण समिती घटित करील व ती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :— पुनरीक्षण समिती घटित करणे.

| | | |
|---|---|---|
| (क) उच्च न्यायालयाशी विचार-विनिमय करून शासनाद्वारे नामनिर्देशित करावयाचा उच्च न्यायालयाचा एक सेवानिवृत्त न्यायाधीश. | — | अध्यक्ष. |
| (ख) शिक्षण संचालक किंवा त्याच्या समकक्ष पद धारण करणारी कोणतीही सेवानिवृत्त व्यक्ती किंवा केंद्रीय शालेय शिक्षण मंडळ किंवा किंवा भारतीय माध्यमिक शिक्षण प्रमाणपत्र मंडळ किंवा अशी अन्य मंडळे यांचा सेवानिवृत्त प्रमुख. | — | सदस्य. |
| (ग) सनदी लेखापाल किंवा व्यय व कामे लेखापाल. | — | सदस्य. |
| (घ) शिक्षण सहसंचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. | — | पदसिद्ध सदस्य-सचिव |

(२) पोट-कलम (१) च्या खंड (ख) आणि (ग) याअन्वये करण्यात आलेली सथदस्याची प्रत्येक नियुक्ती ही पुढील सदस्य मिळून बनलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून शासनाकडून करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| (क) पुनरीक्षण समितीचा अध्यक्ष, | — | अध्यक्ष. |
| (ख) प्रभारी सचिव, विधि व न्याय विभाग, | — | सदस्य. |
| (ग) प्रभारी सचिव, शालेय शिक्षण व विभाग. | — | सदस्य : |

परंतु, पुनरीक्षण समितीचा अध्यक्ष अनुपस्थित राहिल्यामुळे अथवा अन्य कारणाने पुनरीक्षण समितीचा अध्यक्ष म्हणून काम करण्यास असमर्थ असेल तर राज्य शासनास, अध्यक्ष म्हणून काम करण्यासाठी, उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाला नामनिर्देशित करण्याकरिता उच्च न्यायालयाकडे बाब विचारार्थ पाठविता येईल.

विभागीय शुल्क नियामक समितीच्या विवक्षित तरतुदी पुनरीक्षण समितीला लागू करणे.

**१२.** (१) कलम ६ चे पोट-कलम (६), कलम ८ आणि कलम १० ची पोट-कलमे (२) ते (७) यांच्या तरतुदी, पुनरीक्षण समितीला योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

(२) पुनरीक्षण समितीचा निर्णय अंतिम व निर्णायक असेल आणि दोन विद्याविषयक वर्षांकरिता पक्षकारांवर बंधनकारक असेल. उक्त कालावधीच्या शेवटी, खाजगी शाळांना कलम ६ मध्ये घालून दिलेल्या कार्यपद्धतीचे अनुसरण करून शुल्क संरचनेमध्ये बदल प्रस्तावित करण्याचे स्वातंत्र्य असेल.

सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

**१३.** या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा दिलेला कोणताही आदेश याअन्वये विभागीय शुल्क नियामक समिती किंवा पुनरीक्षण समिती यांचा अध्यक्ष किंवा सदस्य किंवा त्यांचा कोणताही अधिकारी यांच्याकडून देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी वा सद्‌भावनापूर्वक केलेली किंवा करण्याचा उद्देश असलेली कोणतीही कृती यांच्या संबंधात त्यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

प्रकरण तीन

## लेख्यांचे विनियमन आणि अभिलेखांचे परिरक्षण

लेख्यांचे विनियमन.

**१४.** शासन, विहित करण्यात येईल अशा रीतीने, खाजगी शिक्षण संस्थेकडून करण्यात येणाऱ्या लेख्यांच्या संनियंत्रणाचे विनियमन करील.

अभिलेखांचे परिरक्षण

**१५.** खाजगी शिक्षण संस्था, विहित करण्यात येईल असे अभिलेखे व विहित करण्यात येईल अशा रीतीने ठेवील.

प्रकरण चार

## अपराध व शास्ती

अपराध व शास्ती.

**१६.** (१) जो कोणी या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे उल्लंघन करील तो, अपराध सिद्ध झाल्यावर,

(क) पहिल्या अपराधासाठी, एक लाख रुपये यापेक्षा कमी नाही परंतु, पाच लाख रुपये यापेक्षा जास्त नाही किंवा या अधिनियमान्वये निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक घेतलेल्या रकमेच्या दुप्पट रकमेपर्यंत, यापैकी जे अधिक असेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल ;

(ख) दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधासाठी, दोन लाख रुपये यापेक्षा कमी नाही परंतु दहा लाख रुपये यापेक्षा जास्त नाही किंवा या अधिनियमान्वये निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक घेतलेल्या रकमेच्या दुप्पट रकमेपर्यंत, यापैकी जे अधिक असेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल.

(२) या कलमान्वये अपराधसिद्ध ठरलेली व्यक्ती, या अधिनियमाचे उल्लंघन करून ज्या विद्यार्थ्यांकडून अधिक शुल्क गोळा करण्यात आले होते, त्या विद्यार्थ्यास ते शुल्क परत करील.

(३) या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन जो व्यक्ती पुन्हा पुन्हा करील ती व्यक्ती, कोणत्याही व्यवस्थापनामध्ये किंवा, यथास्थिति, शाळांमध्ये अधिकृत पद धारण करण्यास पात्र असेल.

व्यवस्थापनाने केलेले अपराध.

**१७.** (१) या अधिनियमाखाली किंवा त्याखाली केलेल्या नियमाखाली व्यवस्थापनाने अपराध केला असेल त्याबाबतीत असा अपराध घडला त्यावेळी जिच्याकडे व्यवस्थापनाचा प्रभार होता आणि व्यवस्थापनाचे कामकाज चालवण्यास व्यवस्थापनास जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे ते व्यवस्थापन देखील, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेल :

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने असा अपराध तिच्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्वत्तोपरी प्रयत्न केले होते असे सिद्ध केल्यास, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी व्यक्ती, या अधिनियमान्वये कोणत्याही शिक्षेस पात्र असणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्याबाबतीत जेव्हा एखाद्या व्यवस्थापनाने या अधिनियमाखालील एखादा अपराध केला असेल, आणि तो अपराध व्यवस्थापनाचा कोणताही पदाधिकारी किंवा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा केल्यामुळे किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे घडला आहे असे सिद्ध झाल्यास, असा पदाधिकारी, अधिकारी किंवा संबंधित कर्मचारी देखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व तिच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा दिली जाण्यास पात्र असेल.

१९७४ चा २.

अपराध आपसात मिटवणे.

**१८.** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १६ अन्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध याबाबतीत शासनाने विशेषरित्या प्राधिकृत केलेल्या अशा अधिकाऱ्याकडून, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची कार्यवाही दाखल होण्यापूर्वी किंवा नंतर, या अधिनियमान्वये अशा अपराधाकरिता असलेल्या अशा द्रव्यदंडाच्या जास्तीत जास्त रकमेहून कमी नाही आणि द्रव्यदंडाच्या जास्तीत जास्त रकमेच्या दुप्पटीहून अधिक नाही इतकी रक्कम दोषारोप ठेवलेल्या व्यक्तीकडून स्वीकारल्यानंतर आपसात मिटविण्यात येईल :

परंतु, अतिरिक्त शुल्क आकारलेल्या अपराधाच्या बाबतीत अशी रक्कम, अतिरिक्तपणे आकारलेल्या शुल्काच्या रकमेच्या दुप्पटीहून कमी नसेल किंवा पाच लाख रुपये यापैकी जी अधिक असेल ती रक्कम.

(२) एखाद्या व्यक्तीने केलेला त्याचा पहिला अपराध आपसात मिटविल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या अवधीत तोच किंवा त्यासमान अपराध करील तर त्याला पोट-कलम (१) लागू असणार नाही.

(३) पोट-कलम (१) अन्वये अपराध आपसात मिटवण्यात आला असेल त्याबाबतीत, त्याच अपराधाच्या बाबतीत आरोपी व्यक्तीविरुद्ध कोणतीही कार्यवाही चालविण्यात येणार नाही, आणि कोणतीही कार्यवाही आधीच चालू असल्यास, ती समाप्त होईल आणि जर आरोपी अभिरक्षेत असेल तर, त्याची तात्काळ सुटका करण्यात येईल.

अपराधांची दखल घेणे.

**१९.** कोणतेही न्यायालय, शासनाच्या किंवा शासन याबाबतीत प्राधिकृत करील अशा शिक्षण उप संचालकांच्या दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीखेरीज या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

अपराध दखलपात्र असणे.

**२०.** या अधिनियमाखालील प्रत्येक अपराध हा दखलपात्र असेल.

प्रकरण पाच

## संकीर्ण

निदेश देण्याचा अधिकार.

**२१.** राज्य शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही तरतुदी किंवा त्याखाली केलेले कोणतेही नियम किंवा आदेश अंमलात आणण्यासाठी त्याच्यामते आवश्यक किंवा इष्ट असतील असे या अधिनियमच्या तरतुदींशी आणि त्याखाली केलेल्या नियमांशी सुसंगत असलेले सर्वसाधारण किंवा विशेष निदेश कोणत्याही शैक्षणिक संस्थेला देता येतील आणि त्या शैक्षणिक संस्थेचे व्यवस्थापन अशा प्रत्येक निदेशाचे अनुपालन करील.

नियम करण्याचा अधिकार.

**२२.** (१) राज्य शासनास या अधिनियमाची सर्व किंवा कोणतीही प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितिक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन वा त्याहून अधिक अधिवेशनात मिळून, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांची सहमती झाली किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांची सहमती झाली आणि तशा आशयाचा त्यांचा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित केला तर तो नियम असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून, तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

हा अधिनियम अन्य कोणत्याही अधिनियमास पूरक असणे व अल्पीकरण करणारा नसणे.

**२३.** या अधिनियामच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमास पूरक असतील आणि त्याचे अल्पीकरण करणाऱ्या नसतील.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**२४.** (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास राज्य शासनास, प्रसंगानुरूप, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांकरिता त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - ४११ ००१.

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

* **संचालक,**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२/२३६३२६९३ व २३६३०६९५,
  २३६३११४८, २३६३४०४९.
* **व्यवस्थापक,**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  पुणे - ४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०/२६१२५८०८, २६१२४७५९.
* **व्यवस्थापक,**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हिल लाईन्स,
  नागपूर - ४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२/२५६२६१५.
* **सहायक संचालक,**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार,
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०/२३३१४६८, २३३१५२५.
* **व्यवस्थापक,**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर - ४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१/२६५०३९५, २६५०४०२.

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते.**